जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JUL 2024
तरुण भारत

# विद्यापीठात यंदापासून बी. कॉम. पदवी अभ्यासक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध अभिनव अभ्यासक्रम राबविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने या वर्षीपासून बी. कॉम. (बीएफएसआय) हा आणखी एक रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

यंदापासून वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या अंतर्गत बी. कॉम. (बीएफएसआय) हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे. बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस (वित्तीय सेवा) आणि इन्शुरन्स (विमा) या दैनंदिन व्यावहारिक जीवनातील अत्यावश्यक सेवा आहेत. त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात. प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेण्यासाठी या अभ्यासक्रमामध्ये एक वर्षाच्या अप्रेंटिसशीपचा समावेश आहे. त्यासाठी विद्यापीठाने अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक असोसिएशन यांच्याबरोबर सामंजस्य करार केला आहे. विद्यार्थ्यांना बँकिंग, अकौंटिंग, ऑडिटिंग, इन्शुरन्स यांसह विविध वित्तीय सेवा संस्थांमध्येही करिअरची संधी मिळेल. त्यामुळे या अभ्यासक्रमाला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा.



- बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रात करिअरच्या संधी

**बी.कॉम. (बी.एफ.एस.आय.) अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये:**

- पहिला अप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (ए.ई.डी.पी.)
- बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास पात्र
- कौशल्यावर आधारित अध्यापन
- औद्योगिक क्षेत्राच्या गरजेनुसार अभ्यासक्रम

0 5 JUL 2024 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बीएफएसआय पदवी

## यंदापासून प्रवेश : बँकिंग, वित्तीय सेवा, विमा क्षेत्रात संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने यावर्षीपासून बी.कॉम. (बीएफएसआय) हा आणखी एक अभिनव आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

विद्यापीठाने यंदापासून वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या अंतर्गत बी. कॉम. (बीएफएसआय) हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे. बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस (वित्तीय सेवा) आणि इन्शुरन्स (विमा) या दैनंदिन व्यावहारिक जीवनातील अत्यावश्यक सेवा आहेत. त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात.



### बी.कॉम. (बीएफएसआय) अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- पश्चिम महाराष्ट्रातील पहिला अप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (एईडीपी)
- कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास पात्र
- विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाची अप्रेंटिसशीप

त्यादृष्टीने विद्यापीठाने या अभ्यासक्रमाची रचना केली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेता यावा, यासाठी या अभ्यासक्रमामध्ये एक वर्षाच्या अप्रेंटिसशीपचाही समावेश करण्यात आला आहे. त्यासाठी विद्यापीठाने अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक असोसिएशन यांच्यासमवेत सामंजस्य करार केला. सेक्टर स्किल कौन्सिल यांच्यासोबतही करार केला आहे. या संस्था, संघटनांचे विद्यापीठास अप्रेंटिसशीपसह प्लेसमेंट आणि कौशल्य मूल्यमापन आदी बाबींसाठी सहकार्य लाभणार आहे. कौशल्याधारित आणि अनुभवाधिष्ठित अध्ययनाला महत्त्व असणाऱ्या या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विविध वित्तीय सेवा क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JUL 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात बी.कॉम. (बीएफएसआय) अभ्यासक्रम सुरु

कोल्हापूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध अभिनव अभ्यासक्रम राबवणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने यावर्षीपासून बी.कॉम. (बीएफएसआय) हा रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढवण्यासाठी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे धोरण राबवले आहे. त्याअंतर्गत विद्यापीठाने यंदापासून वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या अंतर्गत बी. कॉम. (बीएफएसआय) हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे. बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस (वित्तीय सेवा) आणि इन्शुरन्स (विमा) या दैनंदिन व्यावहारिक जीवनातील अत्यावश्यक सेवा आहेत. त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात.

या अभ्यासक्रमामध्ये एक वर्षाच्या अप्रेंटिसशीपचाही समावेश असून, रोजगाराच्या हमीची अधिक शक्यता निर्माण होईल, असेही त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JUL 2024
सकाळ

# विद्यापीठात 'बी. कॉम.'चा नवा अभ्यासक्रम

कोल्हापूर, ता. ४ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध अभिनव अभ्यासक्रम राबविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने या वर्षीपासून बी. कॉम. (बीएफएसआय) हा आणखी एक अभिनव आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी आज दिली. बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस (वित्तीय सेवा) आणि इन्शुरन्स (विमा) या दैनंदिन व्यावहारिक जीवनातील अत्यावश्यक सेवा आहेत. त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात. त्या दृष्टीने विद्यापीठाने बी. कॉम. अभ्यासक्रमाची रचना केली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेता यावा, यासाठी या अभ्यासक्रमामध्ये एक वर्षाच्या अप्रेंटिसशीपचाही समावेश केला आहे.

05 JUL 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठात यंदापासून बी.कॉम. (बीएफएसआय) पदवी अभ्यासक्रम

कोल्हापूर/प्रतिनिधी :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध अभिनव अभ्यासक्रम राबविणाऱ्या शिवाजी विद्यापीठाने या वर्षीपासून बी.कॉम. (बीएफएसआय) हा आणखी एक अभिनव आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी आज दिली.

डॉ. महाजन यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे धोरण राबविले आहे. याअंतर्गत अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह पदवीस्तरीय आणि एकात्मिक अभ्यासक्रमही राबविण्यास प्रारंभ केला आहे. त्यांना विद्यार्थ्यांचा प्रतिसादही लाभतो आहे. या अभिनव अभ्यासक्रमांच्या मालिकेतच विद्यापीठाने यंदापासून वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या अंतर्गत बी. कॉम. (बीएफएसआय) हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे. बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस (वित्तीय सेवा) आणि इन्शुरन्स (विमा) या दैनंदिन व्यावहारिक जीवनातील अत्यावश्यक सेवा आहेत. त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण घेऊन या क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात. त्या दृष्टीने विद्यापीठाने सदर अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेता यावा, यासाठी या अभ्यासक्रमामध्ये एक वर्षाच्या अॅप्रेंटिसशीपचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची हमी मिळण्याची अधिक शक्यता निर्माण होईल. त्यासाठी विद्यापीठाने अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक असोसिएशन यांच्यासमवेत सामंजस्य करार केला आहे. तसेच, सेक्टर स्किल कौन्सिल यांच्यासोबतही करार करण्यात आला आहे. या संस्था, संघटनांचे विद्यापीठास अॅप्रेंटीसशीपसह प्लेसमेंट आणि कौशल्य मूल्यमापन आदी बाबींसाठी सहकार्य लाभणार आहे. कौशल्याधारित आणि अनुभवाधिष्ठित अध्ययनाला महत्त्व असणाऱ्या या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विविध वित्तीय सेवा क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध होणार आहेत. यामध्ये बँकिंग, अकाऊंटिंग, ऑडिटिंग, इन्शुरन्स यांसह विविध वित्तीय सेवा संस्थांमध्येही करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरला वेगळी दिशा द्यावी, असे आवाहनही अधिष्ठाता डॉ. महाजन यांनी केले आहे.

बी.कॉम. (बी.एफ.एस. आय.) अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये-

1) पश्चिम महाराष्ट्रातील पहिला अॅप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (ए.ई.डी.पी.)




2) कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास पात्र

3) विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाची अॅप्रेंटिसशीप

4) प्रत्येक सत्रामध्ये कौशल्यावर आधारित अध्यापन-अध्ययनावर भर

5) औद्योगिक क्षेत्राच्या मागणी व गरजेनुसार तयार केलेला अभ्यासक्रम

6) अॅप्रेंटिसशिपसह नोकरी व रोजगार मिळण्याच्या अधिक शक्यता

0 5 JUL 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कहाणी 'एल निनो'ची..



भवताल

डॉ. रसिया पडळकर

**'एल निनो'चा प्रभाव साधारणपणे नऊ महिने ते एक वर्ष असतो. सामान्य परिस्थिती आणि 'ला नीना' प्रभावी असताना भारतात पर्जन्यमान अधिक असते.**

पावसाच्या आगमनाची आपण वाट पाहू लागतो तेव्हा अनेकदा एक शब्द आपल्या कानावर पडत असतो, तो म्हणजे 'एल निनो'. हा मूळ स्पॅनिश शब्द, याचा अर्थ, 'लहान मुलगा'. साधारण पंधराव्या शतकात, पेरू देशातील मच्छिमारांनी हा शब्द प्रचलित केला. डिसेंबरच्या दरम्यान त्यांना त्यांच्या किनारपट्टीवर, म्हणजेच दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीवर नेहमीपेक्षा जास्त अशा गरम पाण्याचा अनुभव आला, हा ख्रिसमसचा काळ. त्यामुळे त्यांनी या प्रकाराला, देवाचा लहान मुलगा- 'एल निनो' असे नाव दिले. 'एल निनो' या वातावरणीय प्रकारामध्ये एकूण तीन स्थिती असतात. सामान्य परिस्थिती, 'एल निनो' स्थिती आणि 'ला नीना' स्थिती. 'ला नीना' म्हणजे लहान मुलगी, हा देखील स्पॅनिश शब्दच. हे दोघे बहीण-भाऊ जरी नावाने लहान असले, तरी त्याचे प्रताप मोठे आहेत. जगभरातील, विशेषतः विषुववृत्तीय देशातील आणि दक्षिण गोलार्धातील भूखंडांमध्ये होणाऱ्या पावसाशी याचे जवळचे नाते आहे. चारशे वर्षांपूर्वी मच्छिमारांनी पाडलेले हे नाव, वैज्ञानिक भाषेतही थोड्या फरकाने तसेच वापरले जाते- 'एल निनो- सदर्न ऑसिलेशन.'

सामान्य परिस्थितीमध्ये, प्रशांत महासागरातील गरम झालेले पाणी पूर्व दक्षिणी व्यापारी वाऱ्यांच्या मदतीने ऑस्ट्रेलियाच्या दिशेने सरकते आणि ऑस्ट्रेलियाच्या प्रदेशात कमी दाबाचा पट्टा तयार होतो. परिणामी येथे पाऊस पडतो. ज्यावेळी 'एल निनो' परिस्थिती तयार होते त्यावेळी, प्रशांत महासागरातील गरम पाणी वाहून नेणाऱ्या व्यापारी वाऱ्यांचा प्रभाव कमी होतो आणि हे गरम पाणी दक्षिण अमेरिकेच्या दिशेने पेरू, अर्जेंटिना या देशांच्या दिशेने सरकते आणि त्यांना किनारपट्टीवर गरम पाण्याचा अनुभव येतो. साधारणपणे २ ते ७ वर्षांनी हा 'एल निनो'चा परिणाम अनुभवायला मिळतो; पण त्यात सातत्य नाही. तिसऱ्या 'ला नीना' स्थितीत अधिक तीव्र रूप पाहायला मिळते, म्हणजेच पूर्व दक्षिणी व्यापारी वारे जास्त प्रभावी होतात आणि प्रशांत महासागरातले गरम पाणी अधिक मोठ्या प्रमाणात पश्चिमेकडे म्हणजेच ऑस्ट्रेलियाच्या दिशेने घेऊन जातात. परिणामी त्या भागात अधिक पाऊस पडतो.




'एल निनो' परिस्थिती असताना भारतात पर्जन्यमान अत्यंत कमी होते. मागच्या वर्षी २०२३-२४ दरम्यान अनुभवलेला 'एल निनो' परिणाम एका अत्यंत तीव्र परिणामांपैकी एक होता. त्याच्या परिणामी आपल्याकडे आक्रसलेला पावसाळा आपण अनुभवला. 'एल निनो'चा प्रभाव साधारणपणे नऊ महिने ते एक वर्ष असतो. सामान्य परिस्थिती आणि 'ला नीना' प्रभावी असताना भारतात पर्जन्यमान अधिक असते.

याची कारणे, प्रशांत महासागरातून येणाऱ्या विशिष्ट अशा वाफेच्या ढगांच्या प्रवासात दडलेली आहेत. 'ला नीना' परिणाम सुरू असताना हे वाफ भरलेले ढग मोठ्या प्रमाणात भारताकडे सरकतात. 'एल निनो' काळात या वाफ भरल्या ढगांना ढकलायला म्हणावा तसा तीव्र दाब दक्षिणेकडून न मिळाल्याने भारतात पर्जन्यमान कमी होते. यावर्षीच्या मेपर्यंत 'एल निनो'चा प्रभाव कमी होईल आणि सामान्य परिस्थिती पूर्ववत होईल असा अंदाज होता. त्याप्रमाणे एप्रिल-मे-जूनचा ओशियानिक निनो इंडेक्स ०.५ या निर्देशांकाच्या खाली आला; पण जरी 'एल निनो' परिस्थिती निवळली असली तरी, त्याचा प्रभाव अजून काही आठवडे जाणवत राहील ज्यामुळे भारतीय पर्जन्यमान थोडे दोलायमान होऊ शकते. हवामान बदलाचे तीव्र परिणाम भोगावे लागणाऱ्या भारतासारख्या देशांना आणि आपल्यासारख्या कृषिप्रधान परिसराला पावसाच्या या अस्थिरतेचा जोरदार फटका बसतो. म्हणूनच आधुनिक तंत्रज्ञानाची आणि पारंपरिक लोकज्ञानाची सांगड घालून आज ५ जुलै जलसंपत्ती दिनानिमित्त अधिक सक्षम आणि लवचिक अशा पाणी धोरणाची आणि हवामान अंदाजाची गरज येथे व्यक्त करणे योग्य ठरेल.

05 JUL 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात यंदापासून बी.कॉम. 'बीएफएसआय' अभ्यासक्रम

## बँकिंग, वित्तीय सेवा, विमा क्षेत्रात करिअरच्या संधी; एक वर्षाची अप्रेंटिसशिप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध अभिनव अभ्यासक्रम राबविणाऱ्या शिवाजी विद्यापीठात यावर्षापासून बी.कॉम. बँकिंग फायनान्शियल सर्व्हिसेस अॅन्ड इन्शुरन्स (बीएफएसआय) हा अभिनव अभ्यासक्रम सुरू होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना बँकिंग, अकाऊंटिंग, ऑडिटिंग, इन्शुरन्स यांसह विविध वित्तीय सेवा संस्थांमध्येही करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे धोरण राबविले आहे. अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह पदवीस्तरीय व एकात्मिक अभ्यासक्रमही राबविण्यास प्रारंभ केला आहे. अभिनव अभ्यासक्रमांच्या मालिकेतच विद्यापीठाने यंदापासून वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या अंतर्गत बी. कॉम. (बीएफएसआय) हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे.

बँकिंग, फायनान्स सर्व्हिसेस (वित्तीय सेवा) व इन्शुरन्स (विमा) या दैनंदिन व्यावहारिक जीवनातील अत्यावश्यक सेवा आहेत. त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण घेऊन क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतात. त्या दृष्टीने विद्यापीठाने अभ्यासक्रमाची रचना केली आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेता यावा, यासाठी अभ्यासक्रमामध्ये एक वर्षाच्या अप्रेंटिसशिपचाही समावेश केला आहे, अशी माहिती वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

- पश्चिम महाराष्ट्रातील पहिला अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (एईडीपी)
- कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास पात्र
- विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाची अप्रेंटिसशिप
- प्रत्येक सत्रामध्ये कौशल्यावर आधारित अध्यापन-अध्ययनावर भर
- औद्योगिक क्षेत्राच्या मागणी व गरजेनुसार तयार केलेला अभ्यासक्रम



### विविध संस्थांबरोबर सामंजस्य करार

शिवाजी विद्यापीठाने अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक असोसिएशन, सेक्टर स्किल कौन्सिल यांच्यासोबत करार केला आहे. या संस्था, संघटनांचे विद्यापीठास अप्रेंटिसशिपसह प्लेसमेंट आणि कौशल्य मूल्यमापन यासाठी सहकार्य लाभणार आहे. कौशल्याधारित व अनुभवाधिष्ठित अध्ययनाला महत्त्व असणाऱ्या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विविध वित्तीय सेवा क्षेत्रांमध्ये रोजगार मिळणार आहे.